**कृपया प्रसिध्दीसाठी -** **12 जानेवारी, 2010**

**माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक आणि महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटना अध्यक्ष श्री.प्रकाश कुलकर्णी यांनी 12 जानेवारी 2010 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन.**

***कुष्ठपीडितांच्या मागण्या मंजूर न झाल्यास***
***कुष्ठपीडित सामुहिक आत्मदहन करणार.***

**मुंबई, मंगळवार :**"महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेच्यावतीने 18 मागण्यांची सनद मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांना सादर करण्यात आली असून त्याबद्दल समाधानकारक तोडगा न निघाल्यास कुष्ठपीडित सामुहिक आत्मदहन करतील" असा इशारा माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक आणि महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे अध्यक्ष श्री.प्रकाश कुलकर्णी यांनी आज मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत दिला. तसेच मागण्यांच्या समर्थनासाठी 30 जानेवारी महात्मा गांधी पुण्यतिथी आणि जागतिक कुष्ठरोग निर्मूलन दिवसाच्या अनुषंगाने मुंबईत आझाद मैदानावरुन मंत्रालयावर मोर्चाही निघणार असल्याचे श्री.नाईक व श्री.कुलकर्णी यांनी सांगितले.

कुष्ठपीडितांच्या मागण्यांसंबंधी अधिक माहिती देताना श्री.नाईक व श्री.कुलकर्णी यांनी सांगितले की कुष्ठपीडितांच्या मागण्यांसंबंधी तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याशी 14 फेब्रुवारी 2006 आणि 6 ऑगस्ट 2008 रोजी सविस्तर चर्चा होऊन काही मागण्या मान्य करण्याचे त्यांनी आश्वासन दिले, परंतु त्याप्रमाणे कारवाई झाली नाही. त्यानंतर 22 डिसेंबर 2008 रोजी मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांना लेखी निवेदन देऊन तसेच त्यांच्या सचिवालयाला तोंडी स्मरण देऊनही भेटीची वेळ मिळाली नाही. याशिवाय कुष्ठपीडितांच्या समस्यासंबंधी राज्यसभेला 5 डिसेंबर 2007 रोजी विनंती - अर्ज सादर करण्यात आला होता. राज्यसभेच्या विनंती - अर्ज समितीने 24 ऑक्टोंबर 2008 रोजी त्यांचा अहवाल संसदेला सादर करुन अनेक शिफारशी केल्या त्यावरही अद्याप कोणतीही कारवाई केंद्र आणि राज्य सरकारने केली नाही. याचा स्वाभाविक परिणाम कुष्ठपीडितांच्या कुटुंबांवर झाला असल्याने त्यांच्यावतीने 30 जानेवारी रोजी मोर्चा काढण्याचा निर्णय महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेने घेतला आहे. त्या दिवशी मुख्यमंत्र्यांना चर्चा करण्यासाठी वेळ देण्याची विनंतीही करण्यात आली आहे.

अठरा मागण्यांची जी सनद मुख्यमंत्र्यांना 5 जानेवारी रोजी सादर करण्यात आली आहे त्यामध्ये पुढील मागण्या आहेत :1)राज्यसभा समितीच्या शिफारशी प्रमाणे प्रत्येक कुष्ठपीडिताला रु.2,000 चे मासिक अनुदान द्यावे. 2)कर्नाटक, गुजरात व दिल्ली राज्य सरकार ज्याप्रमाणे कुष्ठपीडितांना नोक-या देतात त्याप्रमाणे महाराष्ट्रात नोक-या देण्यात याव्यात. 3)कुष्ठरोग मुक्त नागरिकांच्या नोकरीबद्दलच्या आरक्षणाचा अनुशेष भरुन काढावा. 4)अपंग विकास महामंडळाच्या धर्तीवर कुष्ठपीडितांनाही सवलतीच्या दराने व्यवसायासाठी कर्ज पुरवठा करावा. 5)कुष्ठपीडितांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासहित सर्वप्रकारचे शिक्षण मोफत द्यावे. 6)कुष्ठपीडितांना शासकीय नोकरीसाठी 40 टक्के अपंगत्वाची अट रद्द करावी. 7)महानगरपालिका किंवा अन्य सरकारी संस्थानी जमिनीचे भाडे, घरफाळा यासारख्या करात 75 टक्के सवलत द्यावी. 8)विसर्जित केलेल्या कुष्ठरोगी महामंडळाची पुनर्स्थापना करुन त्यावर वसाहतीत राहणा-या कुष्ठपीडितांना प्रतिनिधित्व द्यावे. 9)कुष्ठपीडितांच्यासाठी देश पातळीवर योजना आखण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रयत्न करुन विशेष अनुदान मिळवावे. 10)शासकीय कुष्ठरोग निवारण समितीच्या अहवालाची तातडीने अंमलबजावणी करावी. 11)कुष्ठपीडितांच्या वसाहती ज्या जागेवर आहेत तिथेच त्यांचे पुनर्वसन करुन सर्वांना फोटोपास देण्यात यावेत. 12)कुष्ठपीडितांच्या सक्षम मुलांना ऑटोरिक्षा परमिट द्यावे. 13)कुष्ठपीडितांच्या वसाहतीत प्रत्येकी दोघांना रुग्णांच्या हातापायावरील जखमावर मलमपट्टी करण्यासाठी वसाहतींच्या नावावर मानधन देण्यात यावे. 14)कुष्ठपीडितांच्या कुटुंबांना दारिद्रय रेषेखालील समजून दोन रुपये किलो ने 20 किलो गहू व तीन रुपये किलो दराने 15 किलो तांदूळ देण्यात यावेत. 15)केंद्र सरकारच्या गरीबासाठीच्या गृहनिर्माण योजनेतून कुष्ठपीडित कुटुंबांना घरे बांधून द्यावीत. अशा वसाहती तामिळनाडू, दिल्ली वगैरे राज्य सरकारांनी बांधल्या आहेत. 16)कुष्ठपीडितांच्या वसाहतींना पाणी व वीज मोफत देण्यात यावी. 17)राज्यसभेच्या विनंती - अर्ज समितीच्या अहवालातील शिफारशी अंमलात आणाव्यात. 18)कुष्ठरोग निर्मुलन व पुनर्वसन क्षेत्रात कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांचे प्रश्न समजून घेऊन सोडवावेत.

"अठरा मागण्यांची सनद मिळवून घेण्याचा संकल्प करण्यासाठी महाराष्ट्रातील कुष्ठपीडित बंधु - भगिनींनी मोठ्या संख्येने मोर्चात सामिल व्हावे" असे आवाहनही श्री.नाईक आणि श्री.कुलकर्णी यांनी पत्रकाच्या शेवटी केले आहे.

**(सचिव)करीता**